# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email :** vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था / ३५५ / २०२४ दि.३०/०६/२०२३

## सर्वसाधारण सभा

नमुना 'अ' (नियम ३ पहा)

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा **वार सोमवार दिनांक २४/०७/२०२३ रोजी दुपारी १२:३०वाजता** नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

## नमूद 'अ' चे जोडपत्र

देहू नगरपंचायतीची **सोमवार दिनांक २४/०७/२०२३**रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.

सभेपुढील विषय .

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे पुरवठा केलेल्या TCL , मेडीक्लोअर केमिकलचे बिल अदा करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४) पर्यटन / सांस्कृतिक दृष्टया महत्वाच्या शहरांमध्ये आकांक्षी (Aspirational) स्वच्छगृहे बांधण्याचे प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत व महिला बाल कल्याण मार्फत होणाऱ्या विविध प्रशिक्षणासाठी मान्यता देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६)पावसाळ्या पूर्वीच्या कामाचे नियोजन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७)देहू नगरपंचायत मध्ये वापरत असलेले उज्वल सॉफ्टवेअर यांना मुदतवाढ देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८)जन्म मृत्यू नोंद सॉफ्टवेअर यांना एक वर्षासाठी मुदत वाढ देणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९)संत तुकाराम विद्यालय व जिजाऊ कन्या विद्यालय व देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व शाळांना पाणी कनेक्शन देणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१०) चव्हाण नगर भाग -२ अंतर्गत येणाऱ्या राजमाता सोसायटी,साई सृष्टी सोसायटी ,संत तुकाराम सोसायटी,शंकर पवळे ते गायकवाड यांचे घरापर्यंत अंतर्गत रस्ते नगरपंचायत फंडातून करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

११) चव्हाण नगर भाग -१ मधील चव्हाण नगर कमान सुशोभिकरणाचे काम करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१२) चव्हाण नगर भाग -१ मधील अशोक लगाडे ते गौतम चव्हाण यांच्या घरापर्यंतच्या ओढ्याचे काम नगरपंचायत फंडातून करणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३) जुने ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४) शिवाजी चौक हनुमान मंदिर (समाजमंदिर) नव्याने प्रशस्त बांधण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५) महाद्वार कमानीच्या जवळी असलेल्या ग्रा.प. शासकीय जागेत अस्मिता भवन बांधणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१६) जुन्या पोस्ट ऑफिस जागेत व्यापार संकुलन बांधणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७) पावसाळ्यात ज्या प्रभागमध्ये मागणीनुसार आवश्यक ठिकाणी आवश्यकतेनुसार मुरूम पुरवठा करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८) प्रभाग क्र.२ मध्ये आवश्यकतेनुसार पेव्हिंग ब्लॉक बसवणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९) प्रभाग क्र.२ अंतर्गत राजमुद्रा सोसायटी अंतर्गत पथदिवे बसविणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२०) प्रभाग क्र. २ मधील रासाई नगर माऊ ली सोसायटी येथे भूमिगत विजेची केबल पाण्याची लाईन टाकणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२१) प्रभाग क्र.१२ मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये ) पिण्याच्या पाण्याची लाईन दुरुस्त करणे व व आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नविन लाईन टाकणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२) प्रभाग क्र.११ मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये ) पिण्याच्या पाण्याची लाईन दुरुस्त करणे व व आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नविन लाईन टाकणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३) प्रभाग क्र.११ मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये )ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे व व आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणी नविन लाईन टाकणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२४) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १५ माळीनगर बोडकेवाडी भैरवनाथ नगर मंदिरा शेजारील सभा मंडपाचे बांधकाम करण्याबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२५) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १५ माळीनगर महात्मा फुले चौक ते परंडवाल चौक ड्रेनेज काम करणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२६) देहू नगरपंचायत हद्दीतील नदीपात्रात 'तुका आकाशा एवढा " हे शिल्प उभारणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२७) देहू नगरपंचायत हद्दीतील मुख्य मंदिर परिसरात लेजर शो कायम स्वरूपी उभारण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२८) देहू नगरपंचायत हद्दीतील परिसरामध्ये म्युरल जिवनावर चित्रफित करण्याबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२९) देहू नगरपंचायत हद्दीतील घाट परिसर वाढविण्याबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

३०) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१५ माळीनगर बोडके वाडी भाग व विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार पेव्हिंग ब्लॉक कामे करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत ,देहू

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा | विषय क्रमांक :- ०१

दिनांक :- २४/०७/२०२३ | ठराव क्रमांक :- ०१

**विषय क्र. १ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

ठराव क्र. १ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

- अजेंठा सात दिवस अगोदर देण्यात यावा व तो कार्यालयीन वेळेतच मिळण्यात यावा. असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.
- मागील मिटींगला जे सदस्य गैर हजर आहे त्यांचे विषय घेण्यात येतील असे ठरले होते पण विषय आलेच नाही. असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- जे विषय मंजूर आहेत ते मंजूरच आहेत पण ज्या विषयावर चर्चा झालेली आहे त्यामुळे जे विषय राहिलेत व चर्चा झालेली आहे ते नगराध्यक्षांच्या परवानगीने मंजूर करण्यात येत आहेत. असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले आहे.

अशा स्वरूपाची चर्चा होऊन मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सुचक :- सौ. मिना राहूल कुऱ्हाडे.
अनुमोदक :- श्री.सुधीर सुरेश काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे......

**सर्वसाधारण सभा** | **विषय क्रमांक :- ०२**

**दिनांक :- २४/०७/२०२३** | **ठराव क्रमांक :- ०२**

**विषय क्र. २ :- मा. सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.**

ठराव क्र. २ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्यांचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सुचक :- सौ.रसिका स्वप्निल काळोखे.

अनुमोदक :- सौ.पुजा अमोल दिवटे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - ०३ | ठराव क्रमांक- ०३
दिनांक -२४/०७/२०२३ | दिनांक -२४/०७/२०२३

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे पुरवठा केलेल्या TCL, मेडीक्लोअर केमिकलचे बिल अदा करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू शहर हे महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रांपैकी एक शहर असून भाविक भक्त लाखोंच्या संख्येने देहू शहरात येत असतात, देहू नगरपंचायत हद्दीत बोडकेवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथून देहू शहरात पाणी पुरवठा केला जातो सदर ठिकाणी असलेल्या जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी शुद्धी करणासाठी लागणारे TCL, मेडीक्लोअर केमिकल गरजेचे असून सदर झालेल्या कामाबाबत चर्चा करण्यात आली असून सदर बिलांची तपासणी करण्यात यावी व पुढील सभेसमोर देयक ठेवण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :श्री सुधिर सु. काळोखे

अनूमोदक :श्री प्रविण रा. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- ०४
ठराव क्र.०४

**विषय— पर्यटन / सांस्कृतिक दृष्टया महत्वाच्या शहरांमध्ये आकांक्षी (Aspirational) स्वच्छगृहे बांधण्याचे प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात मध्ये वारकरी भाविक भक्त यांचे करिता शौचालय बांधणे आवश्यक असून निश्चित प्राथमिक आरोग्य केंद्र, मुख्य कमान परिसर येथे आकांक्षी स्वच्छगृहे बांधणेस प्रशाकीय व वित्तीय मंजुरी सर्वानुमते देण्यात येत आहे आणि सदर ठिकाणी शौचालय बांधणेस इतर शासकीय योजनेतून निधी उपलब्ध झाल्यास सदरची कामे हि शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन अथवा इतर कोणत्याही उबलब्ध होणाऱ्या शासकीय निधीतून करणेस ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. पौर्णिमा वि. परदेशी

अनुमोदक
सौ. पुजा अ. दिवटे

[signature]
अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा  
दिनांक :- २४/०७/२०२३

विषय क्रमांक :- ०५  
ठराव क्रमांक :- ०५

**विषय क्र. ५ :- देहू नगरपंचायत महिला व बाल कल्याण मार्फत होणाऱ्या विविध प्रशिक्षणसाठी मान्यता देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. ५ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण मार्फत होणाऱ्या विविध प्रशिक्षणसाठी मान्यता देणे बाबत विचार विनिमय केला असता देहू नगरपंचायत हद्दीतील महिलांनसाठी आरीवर्क, महेंदी, चौपारी डिश इत्यादी प्रशिक्षण आयोजीत केले असता महिलांना त्याचा खुपच उपयोग होईल त्यापासुन त्यांना त्यांचा स्वताहाचा रोजगार उपलब्ध करन्रा येऊ शकतो. त्यासाठी स्थानिक महिलांना प्रशिक्षण देताना १०० महिलांचा ग्रुप तयार करण्यात यावा. व जास्त महिला झाल्यातर १०० महिलांचा दुसरा ग्रुप तयार करून त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

शालेय विद्यार्थ्यांनसाठी बाल लैगिक शोषणा बाबतचे प्रत्येक्ष शाळेत शि बीर आयोजीत करण्यात यावे. जिल्हा परिक्षद शाळांमध्ये प्रथम .शि बीर आयोजीत करण्यात यावे. सदर महिला व बालकल्याण समिती साठी किती निधीची तरतुद आहे याचा आढावा घेण्यात यावा व निधी प्रमाणे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात यावे.अशा स्वरूपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- सौ.पौर्णिमा विशाल परदेशी.  
अनुमोदक :- सौ. सपना जयेश मोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत  
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- ०६
ठराव क्र.०६

विषय— **पावसाळया पूर्वीच्या कामाचे नियोजन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीत **पावसाळया पूर्वीच्या कामाचे नियोजन करणे आवश्यक आहे.** या बाबत देहू शहरातील **नागरिकांनी या कार्यालयात व सन्मानीय नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे तसेच पावसाळा येणे पुर्वी खालील नमूद ठिकाणी सदरचे काम करणे आवश्यक आहे** त्यामुळे खालील नमूद कामे ही **शासनाच्या योजनेतून** (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत **किंवा विकास** निधीतुन करणेस या ठरावान्वये **या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.**

१. देहू शहरातील जेथे ओढ्यावर अतिक्रमण झालेल्या आहे अशा ठिकाणचे सर्व्हेक्षण करून घेण्यात यावे.
२. शितलादेवी मंदिर परिसरात पेवर ब्लॉक बसिविणे यावे.
३. ओमकार सोसायटी येथील अमृते घर ते मुसुडगे घर व ळोलगे घराजवळील रस्त्यावरील पावसाचे पाणी साठते येथील पाण्याचे नियोजन करण्यात यावे.
४. देहू शहरातील जी खूप जुनी घरे असून पडण्याची शक्यता असेल अशा सर्व घरांचे सर्व्हेक्षण करून घेण्यात यावे
५. ओंकार सोसायटी येथील अमृते घर, मुसुडगे घर लोळगे घर यांच्या घरापर्यंत पाण्याची लाईन
६. देहू नगरपंचायत हद्दीत विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार मुरुम पुरवठा करणे.

सुचक
सौ. पुजा सु. काळोखे

अनुमोदक
श्री योगेश ह. काळोखे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा — विषय क्रमांक :- ०७

दिनांक :- २४/०७/२०२३ — ठराव क्रमांक :- ०७

**विषय क्र. ७ :- देहू नगरपंचायत मध्ये वापरत असलेले उज्वल सॉफ्टवेअर यांना मुदतवाढ देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. ७ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतचे मालमत्ता कर व पाणीपट्टी करिता मे उज्ज्वल सॉफ्टवेअर सोल्युशन्स, रोहा, जि.रायगड यांचे सॉफ्टवेअरचा वापर माहे नोव्हेंबर २०२१ पासून करण्यात येत असून सन २०२२/ २३ या कालावधीमध्ये देखील सदर सॉफ्टवेअरचा वापर करणेत आलेल आहे. सदरचे सॉफ्टवेअर हे निविदा प्रक्रिव्दारे देहू नगरपंचायतीस उपलब्ध करून घेण्यात आले असून त्यानुसार मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीची कार्यवाही करणेत येत होती. माहे एप्रिल २०२३ मध्ये सदर सॉफ्टवेअरची मुदत संपुष्टात आल्यामुळे नवीनं आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता सदरचे सॉफ्टवेअरचा नगरपंचायतीस वापरता येणार नसलेमुळे सन २०२३-२४ वर्षाची मालमत्ता व पाणीपट्टी कराची बिले तयार करणेत आली नाही.

त्याचप्रमाणे राज्यातील नागरीकांना ऑनलाईन सेवा पुरविणेचे शासन धोरण असून शासनामार्फत सेवा पुरविणे कामी IWBP प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत दिल्या जाणाऱ्या नागरीसेवा Online पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी शासन नियुक्त केलेल्या कंपणीमार्फत उपलब्ध असलेला मालमत्ता कराचा डेटा रिपोर्ट करणे आवश्यक आहे. तथापी सध्या वापरात असलेले उज्ज्वल सॉफ्टवेअर हे खाजगी स्वरूपाचे असलेमुळे IWBP प्रणाली सॉफ्टवेअरमध्ये सदरचा डेटा रिपोर्ट होत नसलेमुळे आळंदी नगरपंचायचे संगणक अभियंता यांनी EXCEL SHEET मध्ये डेटा तयार करून घेणेच्या सुचना दिल्या आहेत त्यानुसार माहिती तयार करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही पुर्ण होऊन सदरील पोर्टल पुर्णपणे कार्यान्वीत होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे देहू नगरपंचायतमध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी करासाठी वापरण्यात येत असलेले उज्ज्वल सॉफ्टवेअर सोल्युशन्स यांना पुढील ०६ महिन्यासाठी मुदतवाढ देऊन मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची वसुली करता येणे शक्य आहे. तरी त्यांना मुदत वाढ देण्यात यावी. अशा स्वरूपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे.

अनुमोदक :- श्री.मयुर दत्तात्रय शिवशरण.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३

विषय क्रमांक :- ०८
ठराव क्रमांक :- ०८

**विषय क्र. ८ :- जन्म मृत्यू नोंद सॉफ्टवेअर यांना एक वर्षासाठी मुदत वाढ देणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. ८ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मधील जन्म- मृत्यूच्या नोंदी करिता ग्रामपंचायत काळापासुन वापरण्यात येणारे जिल्हा परिक्षद पुणे यांच्या मार्फत पुरविण्यात आलेले सॉफ्टवेअर ग्रामचैतन्य हे सॉफ्टवेअर वापरात असलेल्या सॉफ्टवेअरला मागील एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ माहे मार्च २०२३ मध्ये संपुष्ठात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने नगरपालिका, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांच्या मार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवा ऑनलाईन पुरविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार शासनाकडुन IWBP प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आली असुन सदर प्रणालीमध्ये नगरपंचायतीची विविध सेवांची उपलब्ध असलेली माहिती सदरच्या प्रणालीमध्ये अपलोड करुन नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देण्यास काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत चैतन्य सॉफ्टवेअर यांचे सॉफ्टवेअर जन्म-मृत्यू , विवाह नोंद साठी वापरात असलेले चैतन्य सॉफ्टवेअर यांचे ग्रामचैतन्य सॉफ्रटवेअर यांना मुदतवाढ देण्यास काहिही हरकत नसुन मुदवाढ देण्यात यावी.अशा स्वरूपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.आदित्य चिंतामण टिळेकर.
अनुमोदक :- सौ.मिना राहूल कुऱ्हाडे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - ०९
दिनांक -२४/०७/२०२३

ठराव क्रमांक- ०९
दिनांक -२४/०७/२०२३

विषयाचे नाव- संत तुकाराम विद्यालय व जिजाऊ कन्या विद्यालय व देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व शाळेना पाणी कनेक्शन देणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सदरचा विषय सभेसमोर वाचण्यात आल्यावर सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व शाळांना पाण्याच्या कनेक्शन देणे गरजेचे असून शाळांच्या मागणी नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून शाळांना आवश्यक कनेक्शन देण्यात यावे तसेच त्यांचे दर देहू नगरपंचायत पाणी दर धोरण नुसार आकारण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक : श्री सुधीर रु. काळोखे

अनूमोदक : श्री योगेश ह. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शं. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १०
ठराव क्र.१०

**विषय— चव्हाण नगर भाग -2 अंतर्गत येणाऱ्या राजमाता सोसायटी,साई सृष्टी सोसायटी ,संत तुकाराम सोसायटी, शंकर पवळे ते गायकवाड यांचे घरापर्यंत अंतर्गत रस्ते नगरपंचायत फंडातून करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, चव्हाण नगर भाग -2 अंतर्गत येणाऱ्या राजमाता सोसायटी,साई सृष्टी सोसायटी ,संत तुकाराम सोसायटी,शंकर पवळे ते गायकवाड यांचे घरापर्यंत अंतर्गत रस्ते करणे नागरिकांना सोयीचे दृष्टीने आवश्यक आहेत. मा. नगराध्यक्षा यांचेकडे व स्थानीक भागातील नागरिकांनी रस्ते करणे कमी वेळोवेळी मागणी केली आहे. सदरचे रस्ते करणे आवश्यक असल्यामुळे हि कामे शासनाच्या दलितवस्ती सुधार योजना (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन अथवा इतर कोणत्याही उवलब्ध होणाऱ्या शासकीय निधीतून करणेस ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. मिना रा. कुऱ्हाडे

अनुमोदक
सौ. सपना मयेश मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक ११ | ठराव क्रमांक - ११

दिनांक - २४/०७/२०२३ | दिनांक- २४/०७/२०२३

विषय - चव्हाण नगर भाग-१ मधील चव्हाण नगर कमान सुशोभीकरण करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू शहर हे महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रांपैकी एक शहर असून भाविक भक्त लाखोंच्या संख्येने देहू शहरात येत असतात, अश्यात देहू नगरपंचायतने स्वच्छ सर्वेक्षण वर लक्ष केंद्रि केल्यास देहू शहराचा विकास चांगल्या गतीने होण्यास मदत होणार आहे. देहू नगरपंचायतच्या मार्गदर्शनाप्रमाणे सन 2022-23 माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या टूलकिट नुसार तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेश व निर्देशनानुसार राज्य व राष्ट्रीय स्तरावर उच्च व चांगले मानांकन प्राप्त करण्यासाठी व भरीव कामगिरी करण्यासाठी तसेच कचरामुक्त शहराचे तारांकित मानांकन या स्पर्धात्मक अभियानामध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या अनुषंगाने शहरातील प्रभाग क्र. ९ मध्ये चव्हाण नगर भाग-१ मधील चव्हाण नगर कमान सुशोभीकरण करणे आवश्यक असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान / राज्य स्तर / जिल्हा सार/ १५ वित्त आयोग/विशेष वैशिष्ठपूर्ण योजना/ न.पा.फंड/ विकास निधी/ नागरी दलितेतर/स्वच्छ भारत मिशन अंतर्गत येणाऱ्या निधीतुन यातुन करण्यात यावा.

सूचक : सौ. मिना श. कुऱ्हाडे

अनुमोदक : श्री सुधीर मु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण

अध्यक्ष

देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १२
ठराव क्र.१२

**विषय— चव्हाण नगर भाग -1 मधील अशोक लगाडे ते गौतम चव्हाण यांच्या घरापर्यंतच्या ओढ्याचे काम नगरपंचायत फंडातून करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत चव्हाण नगर भाग -1 मधील अशोक लगाडे ते गौतम चव्हाण यांच्या घरापर्यंतच्या ओढ्याचे काम करणे गरजेचे आहे सदर ठिकाणी ओढा हा सध्या परिस्थितीला चालू नसल्यामुळे सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे रोगराई पसरु शकते . मा. नगराध्यक्षा यांचेकडे व स्थानीक भागातील नागरिकांनी ओढ्याचे काम करणे कमी वेळोवेळी मागणी केली आहे. सदरचा ओढा करणे आवश्यक असल्यामुळे हि कामे शासनाच्या दलितवस्ती सुधार योजना (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन अथवा इतर कोणत्याही उबलब्ध होणाऱ्या शासकीय निधीतून करणेस ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री सुधीर सुरेश काळोखे

अनुमोदक
श्री आदित्य चिंतामण टिळेकर

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १३
ठराव क्र.13

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

विषय— जुने ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारणे करिता सर्व सदस्यांच्या उपस्थिती मध्ये प्रत्यक्ष जागेची स्थळ पाहणी करून जागा निश्चिती बाबत ठरवण्यात येईल. जागा निश्चिती झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा करण्यास पुढील धोरण निश्चित करण्यात येईल.

सुचक
सौ. प्रियंका अ. मोरे

अनुमोदक
सौ. सपना ज. मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १४
ठराव क्र.१४

**विषय— शिवाजी चौक हनुमान मंदिर (समाजमंदिर) नव्याने प्रशस्त बांधण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे..**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत शिवाजी चौक हनुमान मंदिर (समाजमंदिर) नव्याने प्रशस्त बांधणे आवश्यक असून सदर ठिकाणची सध्या असलेल्या जीर्ण इमारतीची जागा हि छोटी पडत आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, महिला-बालकल्याण कार्यक्रम, समाज प्रबोधन कार्यक्रम किंवा नगरपंचायतीचे विविध कार्यक्रम घेण्यास जागा अपुरी पडत आहे. या संदर्भात नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे मागणी केली आहे. त्यामुळे सदर जागेत प्रशस्त इमारत बांधणे आवश्यक आहे. शासना मार्फत प्राप्त होई पर्यंत तूर्तास इमारतीचे दुरूस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात यावी. नवीन इमारत (समाजमंदिर) व दुरूस्तीचे हे काम शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री प्रविण श. काळोखे

अनुमोदक
सौ. प्रियंका अ. मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १५
ठराव क्र.१५

विषय— महाद्वार कमानीच्या जवळी असलेल्या ग्रा.प. शासकीय जागेत अस्मिता भवन बांधणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, महाद्वार कमानीच्या जवळी असलेल्या ग्रा.प. शासकीय जागेत अस्मिता भवन बांधणे बाबत चर्चा करण्यात आली की, सदर जागेची स्थळ पाहणी करण्यात यावी. सदर हा विषय हा पुढील सभेला घेण्यात यावा.

सुचक
सौ. पुनम बि. काळोखे

अनुमोदक
सौ. प्रियंका स. मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १६
ठराव क्र. १६

**विषय– जुन्या पोस्ट ऑफिस जागेत व्यापार संकुलन बांधणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, जुन्या पोस्ट ऑफिस जागेत व्यापार संकुलन बांधणेसाठी प्रत्यक्ष जागेची स्थळ पाहणी करून जागा निश्चिती करण्यात येईल. आवश्यकत्या सर्व शासकीय विभागाच्या आवश्यक परवानगी घेऊन सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन सदर काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. पुनम वि. काळोखे

अनुमोदक
श्री. प्रविण श. काळोखे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १७
ठराव क्र.१७

**विषय— पावसाळ्यात ज्या प्रभागमध्ये मागणीनुसार आवश्यक ठिकाणी आवश्यकतेनुसार मुरूम पुरवठा करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभागामध्ये जेथे पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडलेले ठिकाणी, रस्ते खराब झालेल्या ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मुरूम पुरवठा करून दुरुस्त करणे आवश्यक आहे. तसेच काही नागरिकांनी मा. नगराध्यक्षा व स्थानीक नगरसेवकांकडे मुरूम टाकणेकरिता वेळोवेळी मागणी केली आहे. सदर ठिकाणी मुरूम पुरवठा करणे आवश्यक असल्यामुळे हि कामे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री सुधीर सु. काळोखे

अनुमोदक
सौ. शितल अ. हगवणे.

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १८
ठराव क्र.१८

**विषय— प्रभाग क्र.2 मध्ये आवश्यकतेनुसार पेव्हिंग ब्लॉक बसवणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत मधील प्रभाग क्र २ मध्ये कॉक्रीटचे रस्ते केल्यामुळे रस्त्याची उंची वाढली आहे तसेच क्रॉस कट असणाऱ्या ठिकाणी तसेच काही रस्तयाच्या दोन्ही बाजूला पेव्हींग ब्लॉक नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे प्रभाग क्र २ मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेची मागणी नागरिकांनी स्थानिक नगरसेवक व मा. नगराध्यक्षा यांचेकडे केली आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत **आहे.**

सुचक
सौ. रसिका ख. काळोखे

अनुमोदक
सौ पुजा अ. दिवटे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १९
ठराव क्र.१९

**विषय— प्रभाग क्र.2 अंतर्गत राजमुद्रा सोसायटी अंतर्गत पथदिवे बसविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात प्रभाग क्र. 2 अंतर्गत राजमुद्रा सोसायटी अंतर्गत पथदिवे बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक असून नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरची कामे करणे अत्यावश्यक आहे ही कामे तातडीने करण्यासाठी ही शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ रसिका स्व. काळोखे

अनुमोदक
सौ शितल भ. हगवणे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- १९
ठराव क्र.१९

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— प्रभाग क्र.2 अंतर्गत राजमुद्रा सोसायटी अंतर्गत पथदिवे बसविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात प्रभाग क्र. 2 अंतर्गत राजमुद्रा सोसायटी अंतर्गत पथदिवे बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक असून नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरची कामे करणे अत्यावश्यक आहे ही कामे तातडीने करण्यासाठी ही शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ रसिका स्व. काळोखे

अनुमोदक
सौ शितल श्र. हगवणे

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

Scanned with OKEN Scanner

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २०
ठराव क्र.२०

**विषय— प्रभाग क्र. 2 मधील रासाई नगर माऊली सोसायटी येथे भूमिगत विजेची केबल पाण्याची लाईन टाकणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत मधील प्रभाग क्र २ रासाई नगर, माऊली सोसायटी मध्ये वाढत्या नागरिकीकरण व औदयोगीकीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे तसेच काही भागात पाणी पुरत नसल्याबाबत तक्रारी या कार्यालयात व स्थानीक नगरसेवक तसेच नगराध्यक्षा यांच्याकडे नागरिकांनी केल्या आहेत तसेच तेथील भागात विजेची केबल टाकण्याकरिताही मागणी केली आहे. त्यामुळे रासाई नगर व माऊली सोसायटी येथे पाण्याची लाईन व भूमिगत केबल टाकणेत यावी तरी सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्टयपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. रसिका स्वप्नील काळोखे

अनुमोदक
श्री मयुर द. शिवशरण

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - २१
दिनांक -२४/०७/२०२३

ठराव क्रमांक — २१
दिनांक - २४/०७/२०२३

विषय — देहू नगरपंचायत प्रभाग क्र.१२ मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये) पिण्याच्या पाण्याची लाईन दुरुस्त करणे व आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची नवीन लाईन टाकणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रभाग क्र.१२ मध्ये बऱ्याच ठिकाणी पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत यात प्रामुख्याने सुंदर आळी तसेच सुतार आळी येथील तक्रारी नगरपंचायतीस प्राप्त होत असतात. देहू शहरात प्रभाग क्र.१२ मध्ये आवश्यक ठिकाणी पाहणी करून आवश्यक सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फ़ंडातून/ विकास निधी या लेखा शिर्षातून करण्यात यावा.

सूचक : सौ.सपना ज.मोरे

अनूमोदक : श्री प्रविण रा. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - २२
दिनांक -२४/०७/२०२३

ठराव क्रमांक — २२
दिनांक - २४/०७/२०२३

विषय — देहू नगरपंचायत प्रभाग क्र.११ मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये) पिण्याच्या पाण्याची लाईन दुरुस्त करणे व आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची नवीन लाईन टाकणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रभाग क्र.११ मध्ये बऱ्याच ठिकाणी पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत. देहू शहरात प्रभाग क्र.११ मध्ये आवश्यक ठिकाणी पाहणी करून आवश्यक सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विकास निधी या लेखा शिर्षातून करण्यात यावा.

सूचक : सौ. पौर्णिमा वि. परदेशी

अनूमोदक : सौ. प्रियंका अ. मोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २३
ठराव क्र.२३

**विषय– प्रभाग क्र.11 मध्ये विविध भागामध्ये (गल्लीमध्ये )ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे व व आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणी नविन लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

<u>ठराव</u>

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत प्रभाग क्र. ११ मध्ये खालील नमूद ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे गरजेचे आहे. 1. घोडेकर घर ते परदेशी आळी( सुंदर गल्ली ) 2. दक्षिणमुखी रस्ता ते दत्त मंदिर रोड 3. चव्हाण नगर रोड ते विघ्नहर्ता चौक. 4. महाद्वार ते चौदा टाळकरी कमान सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन नादुरुस्त व काही ठिकाणी ड्रेनेज लाईन नसल्यामुळे सांडपाणी व दुषित पाणी रस्तयावर येत असल्यामुळे रोगराई पसरु शकते त्यामुळे प्रभाग क्र मध्ये खालील नमूद ठिकाणी पावसाळयाअगोदर ड्रेनेज लाईन टाकणेबाबत नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे मागणी केली आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. पौर्णिमा वि. परदेशी

अनुमोदक
सौ. सपना ज. मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १६/०२/२०२३
विषय क्रमांक :- २४
ठराव क्र.२४

विषय— **देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. 15 माळीनगर बोडकेवाडी भैरवनाथ नगर मंदिरा शेजारील सभा मंडपाचे बांधकाम करण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. 15 माळीनगर बोडकेवाडी भैरवनाथ नगर मंदिरा शेजारील सभा मंडपाचे बांधकाम करणे त्यामुळे त्या भागातील, सांस्कृतिक कार्यक्रम, महिला-बालकल्याण कार्यक्रम, समाज प्रबोधन कार्यक्रम किंवा नगरपंचायतीचे विविध कार्यक्रम घेता येथील अशी मागणी तेथील नागरिकांनी स्थानिक नगरसेवक व मा. नगराध्यक्षा यांचेकडे केली आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

अनुमोदक
श्री योगेश बा. परंडवाल

सुचक
श्री आदित्य च. टिळेकर

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २५
ठराव क्र.२५

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. 15 माळीनगर महात्मा फुले चौक ते परंडवाल चौक ड्रेनेज काम करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे..**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. 15 माळीनगर महात्मा फुले चौक ते परंडवाल चौक ड्रेनेज ड्रेनेज लाईन टाकणे गरजेचे आहे सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन नसल्यामुळे सांडपाणी व दुषित पाणी रस्तयावर येत असल्यामुळे रोगराई पसरु शकते त्यामुळे ड्रेनेज लाईन टाकणेबाबत नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे मागणी केली आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री आदित्य चि. टिळेकर

अनुमोदक
श्री योगेश बा. परंडवाल

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २६
ठराव क्र.२६

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील नदीपात्रात 'तुका आकाशा एवढा " हे शिल्प उभारणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील नदीपात्रात 'तुका आकाशा एवढा " हे शिल्प उभारताना आवश्यकत्या सर्व शासकीय विभागाच्या आवश्यक परवानगी घेऊन सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन सदर काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री. सुधीर सु. काळोखे

अनुमोदक
सौ. मिना रा. कुऱ्हाडे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २७
ठराव क्र.२७

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील मुख्य मंदिर परिसरात लेजर शो कायम स्वरूपी उभारण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील इंदायणी नदीपात्रा जवळ मुख्य मंदिर परिसरात लेजर शो कायम स्वरूपी उभारण्याबाबत आवश्यकत्या सर्व शासकीय विभागाच्या आवश्यक परवानगी घेऊन सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन सदर काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ. पुनम वि. काळोखे

अनुमोदक
सौ. सरिता ज्ञा. काळोखे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २८
ठराव क्र.२८

**विषय– देहू नगरपंचायत हद्दीतील परिसरामध्ये म्युरल जिवनावर चित्रफित करण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी घाट परिसरात म्युरल जिवनावर चित्रफित करण्यात यावे. तसेच म्युरल जिवनावर चित्रफित करण्यासाठी आवश्यकत्या सर्व शासकीय विभागाच्या आवश्यक परवानगी घेऊन सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन सदर काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
सौ सपना जयेश मोरे

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

अनुमोदक
सौ प्रियंका श्रमिजीत मोरे

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा
दिनांक :- २४/०७/२०२३
विषय क्रमांक :- २९
ठराव क्र. २९

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय– देहू नगरपंचायत हद्दीतील घाट परिसर वाढविण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**<u>ठराव</u>**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील घाट परिसर वाढविण्याबाबत प्रत्यक्ष जागेची स्थळ पाहणी करून जागा निश्चिती करण्यात यावी. आवश्यकत्या सर्व शासकीय विभागाच्या आवश्यक परवानगी घेऊन सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन सदर काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री सुधिर सु. काळोखे

अनुमोदक
श्री योगेश ह. काळोखे

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

Scanned with OKEN Scanner

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १६/०२/२०२३
विषय क्रमांक :- ३०
ठराव क्र.३०

**विषय-- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.15 माळीनगर बोडके वाडी भाग व विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार पेव्हिंग ब्लॉक कामे करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.15 माळीनगर बोडके वाडी भाग येथील जिल्हा परिषद शाळा व भैरवनाथ मंदिर परिसर या ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक कामे करणेसाठी मागणी नागरिकांनी स्थानिक नगरसेवक व मा. नगराध्यक्षा यांचेकडे केली आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / नगरपंचायत किंवा विकास निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री आदित्य वि. टिळेकर

अनुमोदक
श्री योगेश बा परंडवाल

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

Scanned with OKEN Scanner